# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण इमारत, आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ,
आकुर्डी, पुणे – ४११०४४
Email: ad.pmrda@gmail.com

## जाहिर सुचना

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे अंतर्गत जनसंपर्क अधिकारी, मुख्य विधी अधिकारी व विधी अधिकारी या पदाकरिता अकरा महिन्याच्या कालावधीकरीता करार पध्दतीने ठोक एकत्रित मानधनावर पात्र व इच्छुक उमेदवारांकडून पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, प्रशासन विभाग,नविन प्रशासकीय इमारत, आकुर्डी, पुणे यांचेकडे दि. १२/०७/२०२४ ते दि. १५/०७/२०२४ या कालावधीत कार्यालयीन वेळेत अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर अर्ज ad.pmrda@gmail.com या ईमेलवर किंवा कार्यालयीन पत्त्यावर पाठविण्यात यावेत. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

| अ.क्र. | पदनाम | एकत्रित मानधन | पात्रतेचा निकष |
|---|---|---|---|
| 1. | जनसंपर्क अधिकारी (१ जागा) | ६५०००/- | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता.<br>२) पत्रकरिता व जनसंज्ञापन (Journalism & Mass Communication) मधील पदविका आवश्यक.<br>३) शासकीय / निमशासकीय / नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेतील उप माहिती व जनसंपर्क या पदावरील ५वर्षाचा अनुभव.<br>किंवा<br>अ श्रेणी वृत्तपत्रात काम केल्याचा किमान १० वर्षाचा अनुभव. |
| २ | मुख्य विधी अधिकारी (१ जागा) | ७५०००/- | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची विधी शाखेची पदवी धारण केलेली आहे<br>२) जिल्हा सरकारी वकील / सरकारी वकील / उपसचिव (विधी) / अवर सचिव(विधी) / विधी अधिकारी या पदावर काम केलेले सेवानिवृत्त अधिकारी<br>किंवा<br>उच्च न्यायालयात अथवा त्यांचे अधिपत्याखालील इतर न्यायालयांमध्ये किमान **दहा** वर्ष अधिवक्ता/वकील म्हणून कामाचा अनुभव. याअनुभवामध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ , महाराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६, भूसंपादन, पुर्नवसन इत्यादी प्रकरणांचा अनुभव आवश्यक राहील.<br>३) क्रमांक २ मध्ये नमूद बाबत संबंधित उच्च न्यायालयाच्या किंवा इतर न्यायालयाच्या सक्षम प्राधिकाऱ्यांने प्रमाणित केलेल अनुभव प्रमाणपत्र आवश्यक राहील.<br>४) स्थानिक स्वराज्य संस्था/ प्राधिकरणे / महामंडळे इत्यादी ठिकाणी कंत्राटी विधी अधिकारी म्हणून ५ वर्ष काम केले असल्यास प्राधान्य राहील. |
| | विधी अधिकारी (१ जागा) | ६००००/- | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची विधी शाखेची पदवी धारण केलेली आहे<br>२) सरकारी वकील / अवर सचिव (विधी) / विधी अधिकारी या पदावर काम केलेले सेवानिवृत्त अधिकारी<br>किंवा<br>उच्च न्यायालयात अथवा त्याचे अधिपत्याखालील इतर न्यायालयांमध्ये किमान **पाच** वर्ष अधिवक्ता/वकील म्हणून |

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | | | कामाचा अनुभव. याअनुभवामध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ , महाराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६ भूसंपादन, पुर्नवसन इत्यादी प्रकरणांचा अनुभव आवश्यक राहील.<br>३) क्रमांक २ मध्ये नमूद बाबत संबंधित उच्च न्यायालयाच्या किंवा इतर न्यायालयाच्या सक्षम प्राधिकाऱ्यांने प्रमाणित केलेल अनुभव प्रमाणपत्र आवश्यक राहील.<br>४) स्थानिक स्वराज्य संस्था/ प्राधिकरणे / महामंडळे इत्यादी ठिकाणी कंत्राटी विधी अधिकारी म्हणून ५ वर्ष काम केले असल्यास प्राधान्य राहील. |

अटी व शर्ती :-

1. उमेदवारांनी अर्जामध्ये नमूद केलेले वय, शैक्षणिक अर्हता व अनुभव या अनुषंगाने असलेल्या प्रमाणपत्रांच्या /दाखल्यांच्या स्वसाक्षांकित प्रती (Self Attested Xerox Copies) अर्जासोबत स्कॅन करुन ईमेलवर सादर करावे तसेच सदरच्या स्वसाक्षांकित प्रती मूळ प्रमाणपत्रांसह मुलाखतीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.

2. उमेदवाराने अर्जासोचत माहिती सादर करताना सतत कार्यान्वित असलेला अचूक भ्रमणध्वनी क्रमांक ईमेल आयडी नमूद करावा.

3. सदरची पदे निव्वळ ११ महिन्याच्या कालावधीकरिता कंत्राटी पध्दतीने घेण्यात येणार असून पदाचा कार्यकाळ ११ महिन्याचा असेल,

4. उमेदवार उपरोक्त पदाचे काम करण्यास शारीरिक दृष्ट्या सक्षम असावा.

अधिक माहितीसाठी www.pmrda.gov.in या संकेतस्थळावर भेट द्यावी

(डॉ. योगेश म्हसे) भा.प्र.से.
महानगर आयुक्त
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.

जा.क्र. ८२२/२०२४
दिनांक १० /०७/ २०२४

Scanned with CamScanner